सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,
दुसरामजला, 5-बी.जे.रोड, नवीनमध्यवर्तीइमारत, पुणे-411 001.
दुरध्वनीक्र. 020-26122846/47 विस्तारीतक्र.217 ते 219ई-मेल-agricredit16@gmail.com

जा.क्र.कृषीपत्त-08/व्याज परतावा/जिमसबँका/तपासणी/2228/2022, दिनांक:-21 / 12 /2022

**::-परिपत्रक-::**

प्रति,

1. **विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,(सर्व-मुंबई वगळून)**
2. **जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-1,सहकारी संस्था (सर्व-मुंबई/उपनगर वगळून)**

**विषय:- जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या व्याज परतावा तपासणीबाबत सुधारित सूचना.**

संदर्भ:- 1. या कार्यालयाकडील परिपत्रक क्र.कृषिपत-4/व्याज परतावा/सुधारित दि. 23/02/2016
2 या कार्यालयाकडील परिपत्रक क्र.कृषिपत-8/व्याज परतावा/जिमस बँका दि. 08/04/2022
3 या कार्यालयाकडील परिपत्रक क्र. कृषिपत-8/व्याज परतावा-1/जिमस बँका, दि. 14/07/2022

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भिय परिपत्रकाकडे आपले लक्ष वेधण्यात येत असून त्याचे अवलोकन करावे.

या कार्यालयाकडील संदर्भिय दि. 23/02/2016 रोजीच्या पत्राद्वारे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडील व्याज परतावा प्रस्तावांच्या तपासणी/सादरीकरणाबाबत सूचना निर्गमित केल्या आहेत.त्यानुसार राज्यातील शेतकऱ्यांना बँकामार्फत 6 % व्याजदराने पीक कर्ज पुरवठा होण्यासाठी शासनाकडून बँकाना व्याज परतावा स्वरुपात अर्थसाह्य देण्यांत येत आहे. या योजनेअंतर्गत व्यापारी बँकांना ( सार्वजनिक क्षेत्रातील, खाजगी क्षेत्रातील व प्रादेशीक ग्रामीण बँका) 1.00 % दराने व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना 2.50 % दराने अर्थसाह्य देण्यांत येत आहे. या योजनेमध्ये रु.3.00 लाखापर्यंतच्या पीक कर्जाचा समावेश केला आहे.

त्याचप्रमाणे संदर्भिय दि. 14/07/2022 रोजीच्या परिपत्रकाद्वारे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे 2.5% दराचे व्याज परतावा प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर करण्याबाबतची सुधारित कार्यपध्दती कळविण्यात आलेली आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना द्यावयाच्या 2.50% दराच्या व्याज परताव्याबाबत शासन निर्णय दि. 31/10/2015 व दि. 16/02/2016 अन्वये व्याज परतावा मागणीचे प्रस्ताव बँकांनी वैधानिक लेखापरिक्षकांकडून तपासून-प्रमाणित करुन सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या कार्यालयाकडील संदर्भिय दि. 08/04/2022 रोजीच्या पत्राद्वारे बँकांचे वार्षिक/अतिरिक्त व्याज परतावा मागणीचे प्रस्ताव वैधानिक लेखापरिक्षकांमार्फत अथवा संबंधित जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-1, सहकारी संस्था यांचेमार्फत तपासून प्रमाणित करुन घेण्यात यावे असे कळविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे या कार्यालयाकडील संदर्भिय दि.14/07/2022 रोजीच्या परिपत्रकाद्वारे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे व्याज परतावा मागणीचे प्रस्ताव विभागीय सहनिबंधक यांचेमार्फत सादर करण्याबाबत व सदरचे प्रस्ताव विभागीय सहनिबंधक यांनी जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-1 यांचेकडून तपासून घेण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

शासनाकडील दि. 31/10/2015 व दि.16/02/2016 रोजीच्या शासन निर्णयाद्वारे पीक कर्जावरील व्याज परताव्याच्या रक्कमांचा हिशोब, कर्ज दिल्याच्या किंवा उचल तारखेपासून शेतक-यांकडून कर्जाची प्रत्यक्ष परतफेड होणाऱ्या तारखेपर्यंत किंवा सदर कर्जफेडीसाठी बँकांनी निश्चित केलेल्या तारखेपर्यंत (जास्तीत जास्त एक वर्ष कालावधीसाठी) यापैकी जी मुदत आधीची असेल ती विचारात घेऊन करण्याबाबत सूचित केलेले आहे. यामधील **"कर्ज दिल्याच्या किंवा उचल तारखेपासून**शेतक-यांकडून कर्जाची प्रत्यक्ष परतफेड" या अनुषंगाने तपासणी करण्याबाबत खालील प्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

"**अ.**1) संबंधित जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत विकास संस्थेच्या सभासद शेतक-यांना मंजूर करण्यात आलेली अल्पमुदती पीक कर्जाची संपूर्ण रक्कम संबंधित शेतक-याच्या बँक किसान क्रेडिट कार्ड बचत खात्यामध्ये बँकेमार्फतप्रत्यक्ष वर्ग झाली असल्याची खातरजमा करावी. त्यासाठी शेतक-यांच्या बँक खात्याचा तपशील बँक शाखेमधील संगणकीय प्रणालीद्वारा पडताळण्यात यावा.

2.) संबंधित शेतक-याने बँक किसान क्रेडिट कार्ड बचत खात्यामधून रक्कम प्रत्यक्षात रोखीने/आरटीजीएस/एनइएफटी द्वारा/ तत्सम पध्दतीने आहरित केली असल्याची खातरजमा करावी. यासाठीसुध्दा शेतक-यांच्या बँक खात्याचा तपशील बँक शाखेमधील संगणकीय प्रणालीद्वारा पडताळण्यात यावा.

**वरील अ. 1 व 2 मुद्याची खातरजमा झाल्यानंतर पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.**

**ब.**1) संबंधित सभासद शेतक-याने संस्थेमध्ये रोखीने कर्ज परतफेड केली असल्यास संस्थेमार्फत त्यास दिलेले जमा पावती/चलन,रोजकिर्द, कर्ज खतावणी व अनुषंगिक अभिलेख्यामधील नोंदी पहाव्यात. यासाठी शेतक-यांच्या व्यवहाराचा तपशील पडताळण्यात यावा.

2) संस्थेकडे रोखीने जमा झालेली कर्ज वसूलीची रक्कम संस्थेच्या बँकेमधील खात्यावरप्रत्यक्ष भरणा केल्याची खातरजमा करावी. यासाठी संस्थेकडील बँक भरणा चलनाच्या प्रती पहाव्यात.

3) सभासद शेतक-याकडून सांगड पध्दतीने /धनादेशाद्वारे/आरटीजीएस,एनइएफटी व तत्सम पध्दतीने /रोखीने बँक खात्यात भरणा केला असल्यास बँकेमधील संबंधित बँक खात्याचा तपशील बँक शाखेमधील संगणकीय प्रणालीद्वारा पडताळण्यात यावा. यासाठीसुध्दा शेतक-यांच्या व्यवहाराचा तपशील पडताळण्यात यावा.

वरीलप्रमाणे मुद्दा क्र. अ. 1 व 2 मध्ये नमुद केल्याप्रमाणे पीक कर्जाचे प्रत्यक्ष वितरण झाल्याची तसेच मुद्दा ब. 1,2 व 3 मध्ये नमुद केल्याप्रमाणे प्रत्यक्षात कर्ज वसूली झाल्याची पडताळणी करणे आवश्यक राहील. केवळ कागदोपत्री/पोकळस्त कर्जवसूली व कर्जवाटप होता कामा नये.बँक धोरणाप्रमाणे पूर्वीच्या कर्जाच्या वसुलीनंतर विशिष्ट कालावधीनंतर नव्याने कर्जवाटप झाले आहे काय याबाबत खात्री करावी. बँकांनी मंजूर केलेली व कर्जखात्यावर कर्ज म्हणून दिसत असलेली रक्कम कर्जदार सभासदाने प्रत्यक्षपणे काढलेली असली पाहिजे. तरी सदर बाबतचा तपशील तपासणेत यावा. तसेच कर्जवसूली रक्कम गट सचिवाने प्रत्यक्षपणे बँकेच्या शाखेत भरणा करणे आवश्यक आहे. भरणा केलेल्या रक्कमेचा तपशील प्रत्यक्षपणे तपासणेत यावा.

वरीलप्रमाणे सुधारित सूचना देण्यात येत आहेत. राज्य शासनामार्फतव्याज परतावा योजनेतंर्गत बँकांना देण्यात येणारे अनुदान पीक कर्जावरील व्याज दर कमी होण्याच्या व शेतक-यांनी पीक कर्ज किफायतशीर व्याज दराने उपलब्ध होण्याच्या दृष्टीने देण्यात येत आहे. शेती उत्पादन किफायतशीर होण्याच्या दृष्टीने सवलतीच्या दरातील पीक

कर्ज महत्वाचा घटक ठरत आहे. शासनामार्फत व्याज परताव्याची रक्कम अनुदान स्वरुपात देण्यात येत असल्याने त्याचा विनियोग योजनेच्या उदि्दष्ठांसाठी होणे आवश्यक आहे. या दृष्टीने पीक कर्ज वितरण व पीक कर्जाची वसूली व्यवहाराची पडताळणी करण्यात यावी. केवळ सवलतीच्या दरातील पीक कर्ज घेण्याच्या अथवा व्याज परतावा अनुदानाचा लाभ घेण्याच्या हेतूने बँक/संस्थास्तरावर करण्यात आलेले व्यवहार या योजनेच्या उद्देशांशी विसंगत आहेत याची नोंद घ्यावी.

या सुधारित सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. या कार्यालयाकडे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे व्याज परतावा मागणीचे प्रस्ताव पाठविण्यापूर्वी वरीलप्रमाणे तपासणी करण्यात यावी.

(अनिल कवडे)
**सहकार आयुक्त व निबंधक**
**सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे**

**प्रत माहिती व कार्यवाहीस्तव:-** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका (सर्व-मुंबई/वर्धा वगळून)

**प्रत:-** मा. अपर मुख्य सचिव (सहकार), सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सविनय सादर.